ePaper

**भारताकडे पुरेसा इंधन साठा! केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांची माहिती**



वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™



पान 2 वरुन...

माळेगाव कारखान्याच्या अध्यक्षपदी सुनेत्रा पवार

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 13 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## होर्मुझ सामुद्रधुनी ओलांडून कच्च्या तेलाचं जहाज मुंबईत सुरक्षित दाखल

# युद्धात गनिमी कावा!



**महाईन्यूज । मुंबई**

**अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे स्ट्रेट ऑफ होर्मुझ या सामुद्रधुनी मार्गे तेलाने भरलेला पहिला टँकर भारतात पोहचला आहे. सौदी अरेबियातून कच्चे तेल घेऊन आलेला हा टँकर मुंबई पोर्टवर पोहचला आहे. युद्धभूमीतून सुरक्षितपणे भारतात पोहचणारा हा पहिला टँकर आहे. अमेरिकाइस्रायलने इराणवर हवाई हल्ले केले. त्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनेई यांचा मृत्यू झाला. त्यानंतर आक्रमक इराणने आखाती देशांवर हल्ले केले. या युद्धामुळे स्ट्रेट ऑफ होर्मुझमधील सागरी वाहतूक ठप्प झाली होती.**

लायबेरियाचा झेंडा असलेल्या शेनलॉन्ग सुएझमॅक्स या जहाजाने १ मार्च रोजी सौदीच्या रास तनुरा बंदरातून कच्चे तेल भरले आणि दोन दिवसांनी तिथून निघाले. सागरी डेटा फर्म लॉयड्स लिस्ट इंटेलिजेंस आणि टँकरट्रॅकर्सच्या मते या जहाजाचे शेवटचे सिग्नल स्थान ८ मार्च रोजी होर्मुझच्या सामुद्रधुनीत होते. हे जहाज अशावेळी भारतात पोहचले आहे जेव्हा इराणने अनेक मर्चेंट शिपवर हल्ले केलेत. चीनला जाणाऱ्या जहाजांशिवाय इतर कुठल्याही जहाजांना या सामुद्रधुनीमार्गे वाहतूक करण्यावर इराणने बंदी घातली होती. हा जगातील सर्वात महत्त्वाचा सागरी मार्ग आहे. जगातील अनेक देशात याच सागरी मार्गाने तेलाची प्रचंड वाहतूक होत असते.

या जहाजाशी निगडित एका व्यक्तीने सांगितले की, मुंबईच्या दिशेने प्रवास करणाऱ्या या जहाजाने अत्यंत सतर्कतेने प्रवास केला. स्ट्रेट होर्मुझसारख्या धोकादायक मार्गावर प्रवास करताना ट्रॅकिंग होऊ नये म्हणून जहाजाने त्याचे ट्रान्सपॉन्डर आणि AIS (ऑटोमॅटिक आयडेंटिफिकेशन सिस्टम) बंद केले होते. त्यामुळे त्याचा माग काढणे अशक्य झाले. हे जहाज बुधवारी दुपारी १ वाजता मुंबई पोर्टवर पोहचले आणि संध्याकाळी ६.०६ वाजता ते रिकामे करण्यात आले.

## गनिमी काव्याचा वापर

शेनलॉन्ग सुएझमॅक्स हे जहाज १ मार्च रोजी सौदी अरेबियातील रास तनुरा बंदराहून तेल भरून ३ मार्चला तिथून निघाले होते. ८ मार्चला त्याचे शेवटचे लोकेशन होर्मुझची सामुद्रधुनी होती. त्यानंतर अचानक हे जहाज रडारवरून गायब झाले. सूत्रांनुसार, या खतरनाक क्षेत्रातून प्रवास करताना जहाजाने वेळ आणि ट्रॅकिंग लपवण्यासाठी जहाजातील ट्रांसपोंडर आणि AIS सिस्टम बंद केली होती. अत्यंत शिताफीने गनिमी काव्याचा वापर करून हे जहाज पुन्हा ९ मार्च रोजी ट्रॅकिंग डेटाबेसवर पुन्हा दिसले. अखेर ११ मार्चला हे जहाज सुरक्षितपणे मुंबईला पोहचले. या जहाजाचे कॅप्टन सुशांत सिंह संधू हे मूळ भारतीय आहेत. त्याशिवाय जहाजावर २९ भारतीय आणि इतर पाकिस्तानी, फिलिपिनो क्रू मेंबर्स आहेत.




## तेलवाहतुकीचे हृदय होर्मुझ

होर्मुझ सामुद्रधुनीतून दररोज सुमारे २० ते २१ दशलक्ष बॅरल कच्चे तेल आणि उत्पादनांची वाहतूक केली जाते. अमेरिकेच्या ऊर्जा माहिती प्रशासनाच्या माहितीनुसार, २०२२ मध्ये या मार्गावरून दररोज सरासरी २१ दशलक्ष बॅरल तेल वाहून नेले गेले, जे जगातील एकूण कच्च्या तेलाच्या व्यापाराच्या सुमारे २१ टक्के आहे. OPEC (ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कंट्रीज) सदस्य असलेल्या सौदी अरेबिया, इराण, संयुक्त अरब अमिराती, कुवैत आणि इराक हे देश बहुतांश याच सामुद्रधुनीतून आशियाकडे कच्च्या तेलाची निर्यात करतात. याशिवाय, जगभरात पुरवला जाणारा एकतृतीयांश द्रवित नैसर्गिक वायूची देखील याच जलमार्गातून निर्यात होते. म्हणूनच होर्मुझ सामुद्रधुनीला ‘जगाचे तेलवाहतुकीचे हृदय’ असे म्हटले जाते.

# माळेगाव कारखान्याच्या अध्यक्षपदी सुनेत्रा पवार

## माळेगाव साखर कारखान्याच्या इतिहासातील पहिल्या महिला अध्यक्ष

**महाईन्यूज । पुणे**

**बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.गुरुवार (दि.१२) संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीत निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी सदरची निवड जाहीर केली. यावेळी कारखान्याच्या उपाध्यक्षा संगीता कोकरे,ज्येष्ठ संचालक बाळासाहेब तावरे,सर्व संचालक,कार्यकारी संचालक अशोक पाटील आदींसह बहुसंख्येने सभासद शेतकरी उपस्थित होते.**



### कारखान्याच्या पहिल्या महिला अध्यक्ष

बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या ७० वर्षाच्या इतिहासात पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून सुनेत्रा अजित पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. तर सध्या कारखान्याच्या उपाध्यक्ष पदी संगीता कोकरे या कार्यरत आहेत एकूणच माळेगाव कारखान्याच्या इतिहासात पहिल्यांदाच अध्यक्ष व उपाध्यक्ष दोन्ही पदे महिलांकडे असतील. उपमुख्यमंत्री व कारखान्याच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी यापूर्वी विविध सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांवर यशस्वीपणे काम केले असून, 'निर्मल वारी' आणि 'पर्यावरण रक्षण' यांसारख्या उपक्रमांमुळे त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अध्यक्ष पदी विद्यमान उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची संचालक मंडळाच्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली.

माळेगाव साखर कारखाना हा राज्यात अग्रगण्य कारखाना म्हणून ओळखला जातो. राज्यात उच्चांकी ऊस दर देणारा कारखाना म्हणून या कारखान्याची ओळख आहे. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कारखान्याच्या आठ महिन्यापूर्वी झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये एक हाती सत्ता मिळवून स्वतः चेअरमन पदाची जबाबदारी घेतली होती.

मागील आठ महिन्याच्या कालावधीमध्ये अजितदादांनी स्वतः जातीने लक्ष घालून कारखान्याचा सर्वस्वी कायापालट करण्याचा निश्चय केला होता. तर राज्यातील पहिल्या पाच सहकारी साखर कारखान्यामध्ये माळेगाव कारखाना आणायचा हा दृष्टिकोन ठेवून काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले होते. यावेळी त्यांनी कारखान्याचा एक रुपयाही न घेता काही कोटी रुपयांचा निधी आणून कारखान्यातील अंतर्गत कामकाजास सुरुवात केली होती. तर येणाऱ्या काळात कारखाना कामगार वसाहत असेल कारखान्याला जोडणारे सर्व रस्ते असतील यासाठी त्यांनी उपाययोजना सुरू केल्या होत्या.

अशावेळी अजितदादांच्या अचानक निधनाने माळेगाव कारखान्याची फार मोठी हानी झाली आहे.तथापि अजितदादांच्या पत्नी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हाती कारखान्याची धुरा सोपवण्यात आली आहे. दरम्यान अजितदादांच्या पावलावर पाऊल ठेवून सुनेत्रा पवार या देखील माळेगाव साखर कारखान्याला राज्यातील पहिल्या पाच कारखान्यात नेऊन ठेवतील असा विश्वास सभासद शेतकरी व्यक्त करत आहेत.

> “ माळेगाव कारखाना हा ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रपंचाशी निगडित व्यवसाय आहे. सहकारा काम करत असताना राजकीय तथा पक्षीय राजकारण बाहेर ठेवून एकमेकांच्या सहकार्याने काम करणे गरजेचे आहे.जेणेकरून कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे हित जोपासणे आणि पारदर्शक कारभार करणे,हीच माझी प्राथमिकता असेल. महिलांना सहकारात मोठ्या जबाबदाऱ्या मिळणे,हा स्त्रीशक्तीचा सन्मान आहे.
>
> - सुनेत्रा अजित पवार, उपमुख्यमंत्री.

# पुणे विद्यापीठातील मराठी भाषा भवन प्रकल्प दहा वर्षांपासून रखडला

**महाईन्यूज । पुणे**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात मराठी भाषेच्या संवर्धनासाठी उभारण्यात येणाऱ्या मराठी भाषा भवनाच्या इमारतीचे काम सुरू होऊन तब्बल दहा वर्षे उलटली, तरी प्रशासकीय दिरंगाई आणि निधीच्या तांत्रिक अडचणींमुळे प्रकल्प अद्याप पूर्णत्वास गेलेला नाही. त्यामुळे शासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी आमदार योगेश टिळेकर यांनी मुंबई येथे केली.**






विधान परिषदेत औचित्याचा मुद्दा उपस्थित करत आ. टिळेकर यांनी या विषयाकडे सरकारचे लक्ष वेधले. ते म्हणाले, मराठी भाषा गौरव दिन नुकताच राज्यभर उत्साहात साजरा झाला. मराठी भाषेचा जागतिक स्तरावर प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने पुणे विद्यापीठ परिसरात मराठी भाषा भवन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन मार्च 2016 मध्ये थाटामाटात करण्यात आले. मात्र त्यानंतर निधीची कमतरता, प्रशासकीय प्रक्रियेतील विलंब आणि तांत्रिक कारणांमुळे इमारतीचे बांधकाम अनेक वर्षांपासून रखडले आहे.

या प्रकल्पाच्या अनुषंगाने विद्यापीठाने तज्ज्ञांची समितीही नियुक्त केली होती. त्या समितीच्या शिफारसीनुसार मराठी भाषा भवनात आंतरराष्ट्रीय दर्जाचे ‘मराठी केंद्र’ स्थापन करण्याचा प्रस्ताव होता. या केंद्रामार्फत मराठी भाषेत ज्ञाननिर्मिती, संशोधन आणि प्रसाराचे विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले होते.

मात्र, ते अजूनही पूर्णत्वास आले नाही. त्यामुळे शासनाने तातडीने या प्रकल्पाकडे लक्ष द्यावे, व आवश्यक निधी उपलब्ध करून देत बांधकाम लवकर पूर्ण करण्यासाठी त्वरित आदेश द्यावेत, अशी मागणी आमदार टिळेकर यांनी केली.

### आराखड्यातील योजना कागदावरच

प्रस्तावित केंद्रात पाठ्यपुस्तक निर्मिती, कोश निर्मिती, अनुवाद कार्य, शालेय ते उच्च शिक्षणातील शिक्षकांना प्रशिक्षण, प्रशिक्षणासाठी विशेष अभ्यासक्रम व साहित्य, विविध बोलीभाषांचा अभ्यास तसेच मराठी भाषेचे संग्राहालय आणि संशोधनासाठी प्रयोगशाळा उभारण्याचा आराखडा तयार करण्यात आला होता. मात्र या सर्व योजना कागदावरच राहिल्या असून मराठी भाषा भवनात अद्याप मराठी भाषा केंद्र स्थापन झालेले नाही.


# भूसंपादनासाठी निधी कमी पडू देणार नाही; मुख्यमंत्री

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या लक्षवेधीवर राज्य शासनाचा प्रतिसाद

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**"पुणे मेट्रोपोलिटन रिजनमध्ये सुरू असलेल्या रस्तेविकास आणि इतर प्रकल्पांचे भूसंपादन करण्यासाठी गती देण्यात येईल. आवश्यक निधी महापालिका आणि राज्य शासन दोन्हीकडून उपलब्ध करून दिला जाईल. कालबद्ध नियोजनासाठी लवकरच आढावा बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**





पुणे मेट्रोपोलिटन रिजन (PMR) मधील वाढत्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी आज विधानसभेत जोरदार चर्चा झाली. आमदार महेश लांडगे यांनी पुणे–नाशिक महामार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडी आणि एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पातील भूसंपादन प्रक्रियेबाबत राज्य शासनाचे लक्ष वेधले. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सकारात्मक प्रतिसाद दिला.

आमदार लांडगे म्हणाले की, पुणे–नाशिक महामार्ग (NH-60) नाशिक फाटा ते इंद्रायणी नदीपर्यंत ६१ मीटर रुंदीकरणासाठी भूसंपादन पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी मंजूर करण्याची आवश्यकता आहे. नाशिक फाटा ते खेड दरम्यान प्रस्तावित एलिव्हेटेड कॉरिडॉर व जोड रस्ते प्रकल्प लवकरच सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच,संपूर्ण PMR क्षेत्रात वाहतूक व्यवस्थापनासाठी सिंगल पॉईंट अथॉरिटी आवश्यक आहे. एमआयडीसी रस्त्यांचे आधुनिकीकरण करुन औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक सुलभ करण्यासाठी विशेष पुढाकर घेण्याची आवश्यकता आहे. पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण पुणे महानगर प्रदेशात मेट्रो नेटवर्क वाढवावा, अशी मागणी सभागृहात केली.

तसेच, केंद्र सरकार आणि राज्य सरकारने या महामार्गासाठी एलिव्हेटेड कॉरिडॉरची घोषणा केली आहे, मात्र १०० टक्के भूसंपादन न झाल्यामुळे रुंदीकरणाचे काम सुरू करता येत नाही. त्यासाठी कालबद्ध नियोजन करून भूसंपादन लवकर पूर्ण करण्याची गरज आहे. देवाभाऊंच्या नेतृत्वाखाली पुणे मेट्रोपोलिटन रिजनमध्ये शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले गेले आहेत आणि आगामी काळात सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या या परिसरात विकासाचे रोल मॉडेल तयार होईल, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

> “ महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी भूसंपादन निधी लवकरात लवकर उपलब्ध करण्यात येईल. काही निधी महापालिका उपलब्ध करेल. त्यांच्या माध्यमातून भूसंपादन होईल. तसेच, पीएमआरडीए आणि राज्य सरकार अशा पातळीवरही निधी उपलब्ध करून देण्यासाठी आढावा बैठक घेण्यात येईल.
>
> - देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री.

# पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकला गती द्या..!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच सादर केलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी 5100 कोटी रुपयांची तरतूद केल्यानंतर मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. राज्य शासनाने निधीची तरतूद केल्याने आता रेल्वे मंत्रालयाने ट्रॅक निर्माणाच्या कामाला गती देण्याची मागणी खासदार बारणे यांनी केली.**




दिल्लीत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची खासदार बारणे यांनी भेट घेतली. पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसरा आणि चौथ्या ट्रॅकचा गरज त्यांना समजावून सांगितली. यावेळी छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपान भुमरे उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, पुणे ते लोणावळा दरम्यान उपनगरीय रेल्वे सेवा सुरु आहे. याचा दररोज एक ते सव्वा लाख प्रवासी लाभ घेतात. या मार्गावर दोन ट्रॅकवरच रेल्वे धावतात. त्यामुळे या मार्गावर रेल्वे गाड्यांची संख्या वाढविणे शक्य नाही. सन २०१७ मध्ये पुणे ते लोणावळा लोहमार्गावर तिसरा आणि चौथ्या ट्रॅक करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्याला मान्यता देण्यात आली.

रेल्वे विभागाने सर्वेक्षणही पूर्ण केले आहे. ट्रॅकसाठी आवश्यक जागाही रेल्वे विभागाकडे आहे. राज्य सरकारकडून निधी मिळत नसल्याने ट्रॅकच्या कामाला अद्यापपर्यंत सुरुवात झाली नाही. रेल्वे मंत्री वैष्णव यांनीही या प्रस्तावित ट्रॅकची पाहणी केली होती. निधी देण्याच्या सूचना राज्याच्या सचिवांना दिल्या होत्या. या ट्रॅकसाठी राज्य सरकार ५० टक्के आणि केंद्र सरकारची ५० टक्के हिस्सेदारी निश्चित आहे.

महायुती सरकारच्या दुसऱ्या अर्थसंकल्पात पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी 5100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे आता रेल्वे मंत्रालयाने ट्रॅक निर्माणाच्या कामाला गती द्यावी अशी मागणी खासदार बारणे यांनी केली. त्याला रेल्वेमंत्री वैष्णव यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. राज्य सरकारने निधीची तरतूद केल्याने आता केंद्र सरकार तातडीने पाऊले उचलेल अशी ग्वाही वैष्णव यांनी दिल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.





## भूमिका

**पश्चिम आशियातील युद्धाचे परिणाम आता संपूर्ण जगावर स्पष्टपणे दिसू लागले आहेत. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर या प्रदेशातील तणाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यानंतर इराणनेही जोरदार प्रतिकार करत विविध ठिकाणी हल्ले केल्याची माहिती समोर येत आहे.**

# इंधन भडका..

त्यामुळे पश्चिम आशियामध्ये युद्धाचा विळखा अधिक घट्ट झाला असून त्याचे परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर दिसू लागले आहेत. आखाती देश हे जगातील प्रमुख तेलपुरवठादार असल्यामुळे या प्रदेशातील अस्थिरतेचा परिणाम थेट इंधन दरांवर आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर होत आहे.

सध्याच्या परिस्थितीत कच्च्या तेलाच्या किमतींनी मोठी उसळी घेतली आहे. काही दिवसांपूर्वी बॅरलमागे सुमारे ७२ डॉलर असलेला कच्च्या तेलाचा दर ११० डॉलरपर्यंत पोहोचला आहे. युद्धाचा धोका वाढत असल्यामुळे अनेक आखाती देशांनी तेल उत्पादन कमी केले आहे. त्यातच होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी जहाज वाहतूक मोठ्या प्रमाणावर विस्कळित झाली आहे. जगातील सुमारे २० टक्के तेल पुरवठा या सामुद्रधुनीतून होतो. त्यामुळे हा मार्ग असुरक्षित झाल्यास त्याचे गंभीर परिणाम जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर १९७० नंतरचे सर्वात मोठे तेलसंकट निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

इंधन हे आधुनिक अर्थव्यवस्थेचे प्रमुख आधार आहे. उद्योग, वाहतूक, शेती आणि दैनंदिन जीवनातील अनेक क्षेत्रांमध्ये इंधनाची मोठी भूमिका असते. त्यामुळे इंधनाच्या दरात वाढ झाली की त्याचा परिणाम थेट महागाईवर होतो. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये हा परिणाम अधिक तीव्रतेने जाणवू शकतो. सध्या केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या दरात तात्काळ वाढ केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर सतत वाढत राहिले, तर ही स्थिती दीर्घकाळ टिकवणे कठीण ठरू शकते.



इंधनाइतकाच स्वयंपाकाचा गॅसही दैनंदिन जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. युद्धामुळे गॅस पुरवठ्यातही अडथळे निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात सुमारे ६० रुपयांची तर व्यावसायिक सिलिंडरच्या दरात सुमारे १२० रुपयांची वाढ झाली आहे. भारतात गेल्या काही वर्षांत गॅस कनेक्शनची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे गॅसची मागणीही वाढली असून देशाला मोठ्या प्रमाणावर गॅस आयात करावा लागतो. मात्र जागतिक पुरवठा साखळी विस्कळित झाल्यामुळे गॅस तुटवडा निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे.

देशातील अनेक शहरांमध्ये गॅस पुरवठा उशिरा मिळत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. मुंबई, बेंगळूर आणि चेन्नईसारख्या महानगरांमध्ये व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा कमी झाल्याने काही हॉटेल्स बंद ठेवावी लागल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईमध्ये तर सुमारे वीस टक्के हॉटेल्स बंद राहण्याची वेळ आली असल्याचे सांगितले जाते. गॅस टंचाईमुळे काळाबाजारालाही उधाण आले असून काही ठिकाणी सिलिंडरचे दर १५०० ते २००० रुपयांपर्यंत पोहोचल्याची उदाहरणे समोर आली आहेत. ही परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलणे अत्यंत गरजेचे आहे.

खरं तर कोणतेही युद्ध केवळ दोन किंवा तीन देशांपुरते मर्यादित राहत नाही. त्याचे परिणाम संपूर्ण जगावर होतात. युद्धामुळे आर्थिक अस्थिरता वाढते, महागाई वाढते आणि उद्योगधंद्यांवर त्याचा परिणाम होतो. सध्याच्या संघर्षामुळेही जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे. भारतामध्ये महागाई वाढणे, औद्योगिक उत्पादन कमी होणे आणि रोजगारावर परिणाम होणे अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

या पार्श्वभूमीवर हे युद्ध लवकरात लवकर थांबणे अत्यंत आवश्यक आहे. जागतिक स्तरावर शांततेसाठी प्रयत्न झाले नाहीत, तर या संघर्षाचे परिणाम अधिक गंभीर होऊ शकतात. त्यामुळे सर्व देशांनी संयम आणि संवादाच्या माध्यमातून हा संघर्ष थांबवण्याचा प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा या युद्धामुळे निर्माण होणारे आर्थिक आणि सामाजिक नुकसान संपूर्ण जगासाठी अत्यंत मोठे ठरू शकते.

## प्रासंगिक »

### स्वावलंबन

***एक माणूस कामासाठी दुस-या शहरात गेला. प्रवासात त्याची काही लोकांशी ओळख झाली. तेही कामा-निमित्ताने त्याच शहरात चालले होते.***

त्यांच्यापैकी काहीजण पायी तर काही घोड्यावर स्वार होते. बोलत चालले असताना एका घोडेस्वाराच्या हातून चाबूक खाली पडला. त्या व्यक्तिने त्या घोडेस्वारास खाली उतरू न देता, चाबूक देण्याची तयारी दर्शविली पण त्या सहका-यास नम्रपणे नकार देत स्वत: खाली उतरून त्या घोडेस्वाराने चाबूक स्वत:च हातात घेतला. खाळून मदत करणा-या व्यक्तिने याचे कारण घोडेस्वारास विचारले असता घोडेस्वार उत्तरला,"आपण ज्यावेळी घोड्यावर बसतो तेव्हा चाबूक आपणच सांभाळावा लागतो. आपण प्रत्येक गोष्टीत स्वयंपूर्ण राहिलो तरच आपल्याला यशाची खात्री आहे असे समजावे."

तात्पर्य:- कुणावरही विसंबून न राहता स्वावलंबनाचा स्वीकार केल्याने यश मिळतेच.

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या विरोधात विरोधी पक्षांनी आणलेला अविश्वास प्रस्ताव आता चर्चेला आला आहे. या प्रस्तावावर लोकसभेत दहा तासांची चर्चा होणार आहे.

# पक्षपातीपणा नसावा



सध्याच्या परिस्थितीत पश्चिम आशियातील युद्धामुळे भारतातील इंधन आणि गॅस पुरवठ्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असताना त्या विषयावर चर्चा होणे अपेक्षित होते. मात्र सरकारने विरोधकांनीच सभापतींविरोधात अविश्वास ठराव आणल्याचे कारण देत त्यावरच आधी चर्चा करण्याचा निर्णय घेतला.

या निर्णयामागे राजकीय गणित असल्याचीही चर्चा आहे. कारण या चर्चेमुळे विरोधी पक्षांचा रोख लोकसभा सभापतींच्या भूमिकेकडे वळेल आणि त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर होणारी टीका काही काळ बाजूला पडेल. त्यामुळे विषयांतर करण्याची संधी सरकारला मिळाल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. तथापि या राजकारणाच्या पलीकडे जाऊन पाहिले, तरी लोकसभा सभापतींच्या कामकाजाच्या पद्धतीवर गेल्या काही दिवसांत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत, हेही तितकेच खरे आहे.

विरोधी पक्षातील सदस्यांना बोलण्याची संधी दिली जात नाही, त्यांच्या भाषणात अडथळे आणले जातात, तसेच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भाषणादरम्यान अनेकदा माइक बंद करण्यात आल्याच्या घटना समोर आल्या आहेत. काही वेळा त्यांच्या भाषणातील भाग रेकॉर्डवरून वगळण्यात आल्याचीही टीका झाली आहे. या सर्व घटनांमुळे सभापतींच्या भूमिकेवर पक्षपातीपणाचा आरोप होत आहे.

संसद हे लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ मानले जाते. त्यामुळे तेथील कामकाज निष्पक्ष आणि सन्मानजनक पद्धतीने चालणे अत्यंत आवश्यक आहे. सभागृहात विरोधी पक्षाची भूमिका महत्त्वाची असते. लोकसभेतील विरोधी पक्षनेते हे 'शॅडो पंतप्रधान' मानले जातात. त्यामुळे त्यांना मोकळेपणाने आपले मत मांडण्याची संधी मिळणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे.

सभापतींचे पद हे अत्यंत प्रतिष्ठेचे आणि जबाबदारीचे असते. त्या पदावर असणाऱ्या व्यक्तीने कोणत्याही पक्षाच्या दबावापासून दूर राहून सर्व सदस्यांना समान न्याय देणे अपेक्षित असते. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांच्यात समतोल राखणे हीच त्या पदाची खरी कसोटी असते. अन्यथा सभागृहाच्या कामकाजावर आणि लोकशाहीच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते.

आज लोकसभेत सभापतींविरोधातील प्रस्ताव बहुमताच्या आधारे फेटाळला जाण्याची शक्यता जवळजवळ निश्चित आहे. मात्र विरोधी पक्षांनी असा प्रस्ताव मांडणे ही बाबच सभापतींसाठी विचार करण्यास भाग पाडणारी आहे. या चर्चेमधून आलेल्या टीकेकडे सकारात्मक दृष्टीने पाहून भविष्यात अधिक निष्पक्षपणे कामकाज चालवणे हीच काळाची गरज आहे.

लोकसभा ही देशाच्या लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर मानली जाते. त्या मंदिराची प्रतिष्ठा टिकवण्यासाठी सभापतींसह सर्व सदस्यांनी संयम, शालीनता आणि परस्पर सन्मान राखणे आवश्यक आहे. लोकशाही बळकट होण्यासाठी निष्पक्षतेचे तत्त्व सर्वात महत्त्वाचे आहे, आणि तेच तत्त्व पुढील काळात लोकसभा कामकाजाचे मार्गदर्शक ठरावे, हीच अपेक्षा.

## ।। अभंगवाणी ।।



आम्हां आम्ही आतां वडील धाकुटीं ।
नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजें ॥१॥

फावला एकांत एकविध भाव ।
हरि आम्हांसवें सर्व भोगी ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अहिल्यानगरची ऐतिहासिक माळीवाडा वेस पाडणार..?

## इतिहासप्रेमींचा विरोध असतानाही माळीवाडा वेस पाडण्याचा मुद्दा पुन्हा चर्चेत

महाईन्यूज । अहिल्यानगर

**शहरातील इतिहासप्रेमी व संस्था, संघटनांच्या विरोधातून महापालिकेने यापूर्वी घेतलेला, सुमारे ४०० वर्षांची ऐतिहासिक माळीवाडा वेस पाडण्याचा निर्णय रद्द केला असताना आता पुन्हा ही सुस्थितीतील वेस पाडण्याची मागणी महापालिका आयुक्तांना निवेदन देऊन करण्यात आली आहे. त्यासाठी आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. आता ही मागणी फुले दांपत्य स्मारक समितीच्या वतीने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे.**



### माळीवाडा वेशीचा इतिहास

मूळ अहमदनगर या नावाने ओळखले जाणाऱ्या व गेल्या वर्षी अहिल्यानगर असे नामांतर झालेल्या शहराची स्थापना १४९० मध्ये मलिक अहमद निजामशहाने केली. त्यानंतर मुघल सरदार सर्जेखान याने शहराच्या संरक्षणासाठी १६३१ मध्ये ११ वेशी उभारल्या. शहराचे प्रवेशद्वार म्हणून त्या ओळखल्या जात होत्या. जकात, येणाऱ्या-जाणाऱ्या व्यापाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी त्याचा वापर होत होता. पुढे शहर विकसित होताना सर्जेपुरा, नालेगाव, बंगालचौकी आदि भागातील ९ वेशी कालौघात नामशेष झाल्या.

येत्या महिनाभरात हा विषय मार्गी न लागल्यास आंदोलन करण्याचा इशारा सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले यांनी यावेळी बोलताना दिला. यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, कृती समितीचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते, नगरसेवक दत्ता गाडळकर, बाळासाहेब भुजबळ, संजय लोंढे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

माळीवाडा भागातील नियोजित महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचे काम तातडीने सुरू करावे, स्मारक भव्य दिव्य व्हावे, त्यासाठी प्रसंगी माळीवाडा वेस पाडावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. क्रांतीसुर्य महात्मा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचे ऊर्जास्थान शहरात उभे राहणार आहे. माळीवाडा येथे भव्य पूर्णाकृती पुतळा व स्मारक उभारण्याच्या कामाला गती मिळावी, यासाठी स्मारक समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

स्मारक होण्यासाठी असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी वेळप्रसंगी आंदोलन करू व त्या मार्ग लावू असेही किशोर डागवाले यांनी म्हटले आहे. महापालिकेने यापूर्वी १२ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर प्रकटन देत, माळीवाडा वेस या नावाने ओळखली जाणारी पुरातन वेस स्थलांतरित करण्याचा-काढण्यासाठी निवेदने प्राप्त झाली आहेत, या ठिकाणी सतत वाहतुकीची कोंडी होते, असे कारण देत ती हटवण्यासाठी-पाडण्यासाठी हरकती मागवल्या होत्या. मात्र शहरातील इतिहासप्रेमी व संस्था, संघटनांनी विरोध केल्याने अखेर महापालिकेने हा निर्णय रद्द केला होता. आता ही मागणी पुन्हा करण्यात आली आहे व त्यासाठी आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

सध्या केवळ माळेवाडा व दिल्ली दरवाजा अशा दोन वेशी आपले अस्तित्व टिकवून आहेत. विशेष म्हणजे दोन्ही सुस्थितीत आहेत. सन २०१८ मध्ये दिल्ली दरवाजा वेस अशीच वाहतुकीला अडथळे होत असल्याचे कारण देऊन महापालिकेने हटवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र नागरिकांच्या विरोधामुळे तो बारगळला.

शहराजवळच निजामशहाने भुईकोट किल्ला उभारला हा भुईकोट किल्ला पुढे मराठ्यांच्या ताब्यात असताना १८०३ मध्ये दौलतराव शिंदे सरदार असताना ब्रिटिशांबरोबर तुंबळ लढाई झाली. ही लढाई माळीवाडा वेशीजवळ झाली. माळीवाडा वेस म्हणजेच किल्ला समजून ब्रिटिशांनी हल्ला चढवला होता. मराठ्यांनी ब्रिटिशांना चोख प्रत्युत्तर दिले. ब्रिटिश अधिकारी व ब्रिटिश सैन्य मारले गेले. त्यांची नावे या माळीवाडा वेशीतील एका स्तंभावर कोरण्यात आली आहेत.

१९४२ च्या स्वातंत्र्याच्या लढाईतील शहरातील स्वातंत्र्यसैनिकांची नावे तत्कालीन महापालिकेने माळीवाडा वेशीजवळ स्तंभ उभारून कोरलेली आहेत. याच माळीवाडा वेशीजवळून १ जून १९४८ मध्ये महाराष्ट्रातील पहिली एसटी बस नगर-पुणे असे धावली. यावेशीजवळील वडाच्या झाडाला एसटीची घंटा बांधण्यात आली होती. हे वडाचे झाड आजही अस्तित्व टिकून आहे. या पहिल्या बसचे वाहक लक्ष्मणराव केवटे हे सुद्धा माळीवाडा वेशीजवळच राहत होते. वेशीसमोर अनेक ऐतिहासिक सभाही झालेल्या आहेत.

# शेअर बाजारातील गुंतवणुकीत परताव्याचे आमिष दाखवत ७ कोटींची फसवणूक

महाईन्यूज । संगमनेर

**शेअर बाजारातील गुंतवणुकीवर मोठा परतावा देण्याचे आमिष दाखवून संगमनेर तालुक्यातील सुमारे ६० ते ६२ नागरिकांची सुमारे ७ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




### मोठ्या परताव्याचे आमिष

एजंटांना भरघोस कमिशन मिळत असल्याने त्यांनी लोकांना मोठमोठ्या गुंतवणुकी करण्यास भाग पाडले. सुरुवातीला काही महिने भक्कम परतावा देण्यात आला. गेल्या सहा महिन्यांपासून कोणताही परतावा दिला गेलेला नाही. विशेष म्हणजे या साखळीत काही सरकारी नोकर एजंट आहेत. यासंदर्भात पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यात अशाच प्रकारे शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवत कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचे गुन्हे पोलिसांकडे दाखल आहेत.

योगेश रामदास जऱ्हाड (रा. आश्वी बु।।, ता. संगमनेर) यांनी फसवणुकीबाबतची फिर्याद पोलीसांकडे दिली आहे. संगमनेर शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जऱ्हाड व त्यांचे मित्र राहुल शिंदे आणि ओळखीचे विजय काळे यांना डिसेंबर २०२४ मध्ये शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीसाठी प्रवृत्त करण्यात आले होते. 'अदमास डेट कन्सल्टन्सी प्रा.लि.' आणि 'प्रथम वेल्थ मॅनेजमेंट' या कंपन्यांच्या माध्यमातून चांगला परतावा मिळेल, असे आमिष त्यांना दाखवण्यात आले. आरोपींनी फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले.

फिर्यादी जऱ्हाड यांनी वेळोवेळी आरटीजीएस आणि फोन-पे द्वारे एकूण १० लाख रुपये संशयित आरोपींच्या खात्यावर वर्ग केले होते. सुरुवातीचे दोन महिने त्यांना ११ टक्के दराने परतावा देण्यात आला. मात्र त्यानंतर परतावा देण्यास टाळाटाळ सुरू झाली. फिर्यादीने जेव्हा संगमनेरमधील घुलेवाडी येथील त्यांच्या कार्यालयात भेट दिली, तेव्हा ते कार्यालय बंद असल्याचे आढळून आले.

केवळ फिर्यादीच नव्हे तर संगमनेर तालुक्यातील इतर ६० ते ६२ नागरिकांनाही अशाच प्रकारे जादा परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणुकीस प्रवृत्त करण्यात आल्याची तक्रार आहे. या सर्वांची मिळून एकूण ६ कोटी ६५ लाख ३९ हजार ८३७ रुपयांची फसवणूक झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणी संशयित चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात केला आहे. हे चौघेही संगमनेर तालुक्यातील रहिवासी आहेत व गुन्हा दाखल झाल्यानंतर पसार झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

पुढील तपास पोलीस निरीक्षक सचिन वाकडे करत आहेत. अहिल्यानगर जिल्ह्याच्या विविध भागात शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास जादा परताव्याचे आमिष दाखवत फसवणुकीच्या मोठ्या घटना गेल्या काही महिन्यांच्या कालावधीत घडलेल्या आहेत. अनेक घटना घडूनही या आमिषाला बळी पडणाऱ्यांची संख्या थांबलेली नाही यापूर्वी पुण्यातील हडपसर येथील' समर्थ क्रॉप केअर ' या गुंतवणूक साखळीत नगर जिल्ह्यातील संगमनेर, राहुरी, कोपरगाव, श्रीरामपूर, श्रीगोंदे आदी तालुक्यातील लोकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली आहे.

# भारताकडे पुरेसा इंधन साठा!

## ४० देशांकडून कच्चे तेल; भारतात पेट्रोल-डिझेल तुटवडा नसल्याचा दावा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारत रशियाकडून तेल खरेदी करतो की नाही? याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे अशी मागणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज लोकसभेत केली. तसंच भारताबाबतचे निर्णय अमेरिका का घेते आहे? असाही प्रश्न त्यांनी विचारला त्यानंतर उत्तर द्यायला केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी उभे राहिले. त्यांनी देशात इंधनाची काय स्थिती आहे याची माहिती दिली. दरम्यान सिंह उभे राहिले तेव्हा 'एपस्टिन का दोस्त आया' अशा घोषणा विरोधकांनी दिल्या.**






हरदीप पुरी यांनी माहिती दिली की भारताकडे कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध आहे. डिझेल, पेट्रोल आणि गॅस सिलिंडर यांची कमतरता भासणार नाही. एलएनजी कार्गो रोज येत आहेत. दुसऱ्या कार्गोंच्या मार्फतही पुरवठा होतो आहे. CNG पुरवठा १०० टक्के होतो आहे. कॅनडा, नॉर्वे, रशिया यांच्याकडून आपण कच्चं तेल घेत आहोत. एलपीजीचं उत्पादन २८ टक्के वाढलं आहे. फ्युएल चॅनल्सचे इतर पर्याय उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. दीर्घ काळ अशा प्रकारच्या स्थितीला तोंड द्यायला आपला देश तयार आहे. तीन मंत्र्यांची एक समिती स्थापन करण्यात आली आहे जी इराण, इस्रायल युद्धस्थिती आणि इंधनाची लागणारी आवश्यकता यावर लक्ष ठेवून आहे. अशी माहिती हरदीप पुरी यांनी दिली. दरम्यान हरदीप पुरी बोलत असताना पूर्ण वेळ विरोधी पक्षाचे खासदार कौन आया कौन आया एपस्टिन का दोस्त आया अशा घोषणा देत होते.

हरदीप पुरी पुढे म्हणाले, इतिहासात अशा प्रकारचं युद्ध जगाने कधीही पाहिलेलं नाही. मात्र मी हे सांगू इच्छितो की भारत कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत सुरक्षित आहे. सध्या जे संकट इराण, इस्रायल युद्धामुळे ओढवलं आहे त्याआधी भारत ४५ टक्के क्रूड ऑईल होर्मुजच्या मार्गाने घेत होता. सध्या भारताकडे इंधनाचा पुरेसा साठा आहे. पेट्रोल, डिझेल, टर्बाइन फ्युएल, केरोसीन, फ्युएल ऑईल यांचा तुटवडा नाही. भारतात येणारं ५५ टक्के कच्चं तेल दुसऱ्या ठिकाणाहून येत होतं. आता हे प्रमाण वाढवून आपण ७० टक्के केलं आहे. २००६-२००७ मध्ये आपण २७ देशांकडून कच्चं तेल घेत होतो. सध्या आपण ४० देशांकडून कच्चं तेल घेत आहोत. आपल्याकडे ज्या देशांचे पर्याय उपलब्ध आहेत ते इतर देशांकडे नाहीत असंही पुरी यांनी सांगितलं. मागील ५ दिवसांमध्ये LPG चं उत्पादन २८ टक्क्यांनी वाढवण्यात आलं आहे. भारतात राहणारे ३३ कोटी कुटुंबं जे गरीब आणि दारिद्र्य रेषेखालील आहेत त्यांना स्वयंपकासाठी गॅस सिलिंडर मिळाला पाहिजे ही भारत सरकारची प्राथमिकता आहे. असंही पुरी यांनी स्पष्ट केलं.

# युद्धाच्या संकटात अडकली १० महिन्यांची भारतीय मुलगी

**महाईन्यूज । कुवेत**

**सलग बाराव्या दिवशीही आखाती युद्ध सुरूच आहे. इराणवर अमेरिका आणि इस्रायलकडून वारंवार हल्ले करण्यात येत आहे. तर इराणकडून पलटवार सुरू आहे. या युद्धात आतापर्यंत २००० जणांचा मृत्यू झाला असून हजारो नागरिक जखमी झाले आहेत. यामध्ये अनेक भारतीय नागरिकही अडकले आहेत. त्यांना मायेदशात परत आणण्यासाठी विविध प्रयत्न सुरू आहेत. मात्र, काही ठिकाणी यश आले तर काहींना अपयश आले आहे.**



### मदत आणि प्रशासकीय उदासीनता

मदतीसाठी पुढाकार घेताना द प्लॅटफॉर्म संस्थेच्या निदर्शनास आले की, कुवेतमधील एमएमके सारख्या स्थानिक संघटना आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन प्रवाशांच्या अन्नाची सोय केली आहे. मात्र, निवाऱ्याचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे. भारतीय दूतावासाकडून रस्ते मार्गाने सौदी अरेबियामध्ये प्रवेश करण्यासाठी ऑनवर्ड तिकीट सारख्या तांत्रिक कागदपत्रांची सक्ती केली जात आहे. आर्थिक संसाधने संपलेल्या गरीब व गरजू भारतीयांसाठी ही अट पूर्ण करणे अशक्य झाले असून, शासन अशा कठीण प्रसंगातही आपल्या नागरिकांकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसत आहे.

इराण-अमेरिका-इस्रायल यांच्यातील वाढत्या तणावामुळे आखाती देशांमध्ये प्रवासादरम्यान अडकलेल्या शेकडो भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी नागपूरची द प्लॅटफॉर्म ही संस्था सक्रिय झाली आहे. कुवेत आणि सौदी अरेबियामध्ये तांत्रिक अडचणींमुळे अडकलेल्या भारतीय कुटुंबांना सुरक्षित निवारा आणि प्रवासासाठी सहकार्य करण्यासाठी संस्थेच्या स्वयंसेवकांनी प्रयत्न सुरू केले आहेत.

भारत ते लंडन असा प्रवास करणारे अनेक भारतीय प्रवासी सध्या कुवेतमध्ये अडकले आहेत. यामध्ये प्रामुख्याने वानखेडे कुटुंबातील ४ वर्षांची मुलगी आणि केरळचे पणीकर कुटुंबातील १० महिन्यांची लहान मुलगी यांचा समावेश असून, ही कुटुंबे २८ फेब्रुवारीपासून कुवेतमध्ये अडकून पडली आहेत. दीर्घकाळ चाललेल्या या संकटामुळे आणि प्रवासात पुंजी खर्च झाल्यामुळे या कुटुंबांना निवाऱ्याची मोठी समस्या भेडसावत आहे.

या मानवतावादी संकटाची दखल घेत द प्लॅटफॉर्म संस्थेने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आमदार नितीन राऊत आणि भारतीय दूतावासाला औपचारिक पत्र पाठवून सर्व तांत्रिक तपशील आणि पासपोर्ट माहिती पुरवली आहे. यामध्ये अडकलेल्या भारतीयांना तात्काळ शासकीय निवारा उपलब्ध करून देणे आणि प्रवासातील जाचक अटी मानवी दृष्टिकोनातून शिथिल करण्याची आग्रही मागणी करण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय संकटाच्या काळात आपल्या नागरिकांना, विशेषतः लहान मुलांना अन्न निवाराचे त्रास भोगणे हे दुर्दैवी आहे. शासनाने आता त्यांच्या सुरक्षित निवाऱ्याची आणि पुढील प्रवासाची जबाबदारी तातडीने स्वीकारली पाहिजे, अशी मागणी राजीव खोब्रागडे, द प्लॅटफॉर्म यांनी केली आहे.

# तारखांच्या गोंधळात अडकली अदा शर्मा



द केरळा स्टोरी सिनेमातून लोकप्रिय झालेली अभिनेत्री अदा शर्माचा सोशल मीडियावर एक व्हिडिओ तुफान व्हायरल होत आहे. ज्यात ती महिन्याभरापासून तिच्याकडे कोणतेही काम नसून ती घरीच बसली आहे. निर्मात्यांच्या एका चुकीमुळे अभिनेत्रीचं संपूर्ण आयुष्य बरबाद झाल्याचे तिने या व्हिडिओमध्ये म्हंटले आहे. अदा शर्मा व्हिडीओ पोस्ट करत म्हणाली, “मी एकाच वेळी तीन प्रोजेक्ट्ससाठी कमिटमेंट दिली होती. मात्र, पहिल्या चित्रपटाच्या निर्मात्याने तारखांबाबत वारंवार बदल केले आणि माझ्या मॅनेजरवर दबाव टाकला. इतकेच नाही तर त्या निर्मात्याने असभ्य वर्तणूक करत शिवीगाळही केली. जेव्हा इतर दोन चित्रपटांच्या दिग्दर्शकांना ही परिस्थिती समजली, तेव्हा त्यांनी सामंजस्य दाखवत आपल्या शूटिंगच्या तारखा बदलल्या, जेणेकरून माझे नुकसान होऊ नये. याचा अर्थ सगळेच लोक वाईट नाहीत तर काही चांगलेही आहेत.”ती पुढे म्हणाली, “मात्र शेवटी ज्या निर्मात्यासाठी मी इतर प्रोजेक्ट्सच्या तारखा बदलल्या, त्यानेच ऐनवेळी शूटिंग रद्द केले आणि आता त्या तारखांची गरज नसल्याचे सांगितले. यामुळे मी गेल्या एक महिन्यापासून ‘वेल्ली’ म्हणजेच रिकामी बसली आहे. माझे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे. मी भावनिक, मानसिक, व्यावसायिक आणि आर्थिकदृष्ट्या सध्या रिकामी आहे.”निर्मात्याने तारखा बदलत राहिल्यामुळे मोठा गोंधळ झाला आहे. तिने स्पष्ट केलं की, “इतर दोन प्रोजेक्ट्च्या निर्मात्यांना पहिल्या निर्मात्यामुळे अखेर तारखा बदलाव्या लागल्या. तिच्या मॅनेजरचा पहिल्या सिनेमाच्या निर्मात्याशी जोरदार वादही झाला.” सध्या सर्वत्र अभिनेत्रीच्या व्हिडीओची चर्चा सुरु आहे. अदाबद्दल सांगायचं झालं तर, ‘द केरळ स्टोरी’ सिनेमामुळे तिच्या चाहत्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली. याशिवाय ती सोशल मिडियावर देखील सक्रिय असते. अनेक व्हिडिओ आणि फोटो ती सोशल मीडियावर शेअर करत असते.

# हॉरर-कॉमेडी ‘भूत बंगला’ टीझर रिलीज


अभिनेता अक्षय कुमारच्या ‘भूत बंगला’ या हार्रर कॅामेडी बहुचर्चेत चित्रपटाचा टीझर रिलीज झाला आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर रिलीज करण्यात आले होते. तब्बल १४ वर्षांनंतर या चित्रपटातून प्रियदर्शन आणि अक्षय कुमार यांची दिग्दर्शक आणि अभिनेत्याची जोडी चाहत्यांना पाहायला मिळणार आहे. या जोडीने काही चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहेत. त्यांच्या प्रत्येक चित्रपटावर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केले आहे. आता या जोडीचा एकत्रित भूत बंगला हा नवीन चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटाच्या टीझरमधून लक्षात येते की हा चित्रपट कॅामेडी आणि जबरदस्त पंचलाईन्सने भरलेला आहे. चित्रपटातील स्टारकास्ट मोठी नसली तरी, सर्वात लक्षवेधी गोष्ट म्हणजे परेश रावल असरानी आणि राजपाल यादव यांसारख्या दिग्गज कलाकारांची जुगलबंदी पाहायला मिळणार आहे. टीझरमध्ये त्यांची छोटीशी झलक त्यांनी याआधी साकारलेल्या अविस्मरणीय पात्रांची आठवण करून देते. टीझरमध्ये दाखवलेली भीतीची छोटीशी झलक दिसते. त्यामुळे ट्रेलरमध्ये आणखी स्पष्टपणे एलिमेंट्स दिसतील. तूर्तास दमदार संगीत, रोचक व्हिज्युअल्स, मजेदार पंचलाईन्स आणि अक्षय कुमार-प्रियदर्शन यांची जोडी चाहत्यांच्या आवडीपैकी एक आहे. या चित्रपटात वामिका गब्बी. तब्बू आणि इतरही कलाकारांच्या भूमिका आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन प्रियदर्शन यांनी केले असून, निर्माते अक्षय कुमार, शोभा कपूर आणि एकता आर. कपूर आहेत. १० एप्रिल २०२६ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. बालाजी मोशन पिक्चर्सने केप ऑफ गुड फिल्म्ससोबत मिळून ‘भूत बंगला’ सादर केला आहे.



# धुरंधर 2 मध्ये यामी गौतमची एन्ट्री?




नुकताच धुरंधर २ चा जबरदस्त ट्रेलर रिलीज झाला. येत्या १९ मार्चला हा चित्रपट देशभरातील चित्रपटगृहात रिलीज होणार आहे. पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर अभिनेता रणवीर सिंहला पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. ट्रेलरमधून चित्रपटात रणवीरचे पात्र अधिक विस्ताराने दाखवण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. अशातच आता नवीन एक माहिती समोर आली असून, चित्रपटात अभिनेत्री यामी गौतम देखील झळकणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, या चित्रपटात यामी एका खास भूमिकेत दिसणार आहे. बॉक्स ऑफिस वर्ल्डवाइडच्या रिपोर्टनुसार, यामी गौतमची विशेष भूमिका चित्रपटात दाखवण्यात येणार असून, तिच्या भूमिकेमुळे एक महत्त्वाचा ट्विस्ट कथेत येणार असल्याचे सांगितले जात आहे.तिचा कॅमिओ रोल असल्याची चर्चा आहे. मात्र, अद्यापर्यंत याबाबत अधिकृत कोणतीही माहिती समोर आलेली नाही.दरम्यान, मेन्सएक्सपीच्या दिलेल्या वृत्तानुसार, “उरी: द सर्जिकल स्ट्राईक” या चित्रपटात यामीने एका गुप्तचर अधिकाऱ्याची भूमिका साकारली होती. जी सशस्त्र दलांशी जवळून काम करते. या चित्रपटात तसा काही रोल तिचा असणार का याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. मात्र, धुरंधर २ हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर तिची भूमिका काय असणार हे स्पष्ट होईल. यामी गौतम या चित्रपटाचे दिग्दर्शक आदित्य धरची पत्नी आहे. रणवीर सिंह लियारीच्या राजा (हमजा अली मजारी उर्फ जसकीरत सिंग रंगी) ची भूमिका पुन्हा साकारणार आहे. ट्रेलरमध्ये अभिनेत्याचा खतरनाक लूक पाहून प्रेक्षक आश्चर्यचकित झाले आहेत.



# अभिनेत्रीचा ४ वर्षांतच मोडला संसार




सुप्रसिद्ध अभिनेत्री हंसिका मोटवानीने ...ार वर्षांपूर्वी बिझनेसमन सोहेल खतुरिया याच्याशी विवाह केला होता. हंसिका आणि सोहेल यांच्या रॉयल विवाहसोहळ्याची जोरदार चर्चा रंगली होती.मात्र, लग्नाच्या चारच वर्षांत दोघांनी वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. कोर्टाकडूनही दोघांच्या घटस्फोटावर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे.हंसिका मोटवानीच्या घटस्फोटाच्या बातमीनं सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. मीडिया रिपोर्टनुसार, मुंबईतील वांद्रे इथे असलेल्या कौटुंबिक न्यायालयाने हंसिका आणि सोहेल यांच्या घटस्फोटाला मंजुरी दिली आहे. हे जोडपं क्षुल्लक गोष्टींवरून वारंवार वाद घालत असे.शिवाय, या दोघांची लाईफस्टाईल एकमेकांपेक्षा पूर्णपणे वेगळी असल्याने एकत्र राहणं या दोघांसाठीही अशक्य झालं, ज्यामुळे दोघांनी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतल्याचे म्हंटले जात आहे. मात्र हंसिका आणि सोहेल यांनी अद्याप अधिकृतरित्या वेगळे झाल्याची घोषणा केलेली नाही. दरम्यान, हंसिका आणि सोहेल यांनी डिसेंबर 2022 मध्ये जयपूर येथील ‘मुंडोटा फोर्ट अँड पॅलेस’मध्ये एका भव्य समारंभात आपली लग्नगाठ बांधलेली. दोघांच्या विभक्त होण्याबाबतच्या चर्चा गेल्या वर्षांपासून समोर आल्या होत्या. हंसिकानं इन्स्टाग्राम हँडलवरून सोहेलसोबतचे सर्व फोटो आणि व्हिडिओ डिलिट केले होते. तेव्हाच चाहत्यांना शंका आली होती. आता या जोडप्यानं आपले मार्ग वेगळे केले आहेत. गेल्या कित्येक दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. दरम्यान, हे सोहेलचं दुसरं लग्न होतं. हंसिकापूर्वी त्याचे लग्न रिंकी बजाज हिच्याशी झालं होतं.



# अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या गोत्यात?

## तिरंग्याचा अवमान केल्याचा आरोप; वकिलाची पोलीस ठाण्यात तक्रार

महाईन्यूज । पुणे

**‘टी-२०’ विश्वचषक विजयाच्या जल्लोषावेळी राष्ट्रध्वज तिरंग्याचा अवमान केल्याचा आरोप करून पुण्यातील वकिलाने अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या याच्याविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रारअर्ज दाखल केला आहे. ही तक्रार दाखल करताना अॅड. वाजिद खान यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात हार्दिक पंड्याने मैत्रिणीसोबत नृत्य करताना राष्ट्रध्वजाचा अवमान केल्याचे व्हिडिओ चित्रीकरणही सोबत जोडले आहे.**



### ध्वज गुंडाळल्याचा आरोप

जल्लोष करत असताना हार्दिक पंड्याने भारतीय ध्वज आपल्या अंगाभोवती गुंडाळल्याचे व्हिडिओमध्ये दिसत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हे राष्ट्रध्वजाच्या सन्मानाच्या नियमांच्या विरोधात असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

### पुण्यात तक्रार दाखल

या प्रकरणी वकील वाजिद खान यांनी पुण्यातील SHIVAJINAGAR POLICE STATION PUNE येथे तक्रार दाखल केली आहे. ‘राष्ट्रीय सन्मान अपमान प्रतिबंधक कायदा, १९७१’ च्या कलम २ चा हवाला देत हार्दिक पंड्याविरोधात कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

भारतीय क्रिकेट संघाने टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडवर शानदार विजय मिळवला. कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने न्यूझीलंडवर हा ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर मैदानावर खेळाडूंनी मोठ्या उत्साहात जल्लोष साजरा केला. या विजयानंतर काही वेळातच खेळाडूंचे कुटुंबीयही मैदानावर आले होते. त्यावेळी हार्दिक पंड्या आणि त्याची मैत्रीणही मैदानावर उपस्थित होती. जल्लोषाच्या वातावरणात हार्दिक पंड्याच्या खांद्यावर भारतीय तिरंगा असल्याचे दिसून आले. पाठीला तिरंगा बांधून तो आपल्या मैत्रिणीसोबत नृत्य करत असल्याचा आरोप अॅड. वाजिद खान यांनी केला आहे.

पंड्याने तिरंग्याचा अवमान केल्याचा आरोप करत राष्ट्रीय गौरव अवमान प्रतिबंधक अधिनियमांतर्गत त्याच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खान यांनी तक्रार अर्जात केली आहे. शिवाजीनगर पोलीस ठाण्यात ही तक्रार दाखल करून घेण्यात आल्याचा दावाही खान यांनी केला आहे. विजयाचा आनंद साजरा करताना हार्दिक पंड्या याने मैत्रिणीसोबत नृत्य केल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. या व्हिडिओनंतर अनेक क्रिकेटप्रेमींनी समाजमाध्यमांवर विविध प्रतिक्रिया व्यक्त केल्या. काहींनी पंड्याच्या या कृतीवर टीका करत आक्षेपही नोंदवला होता. त्यानंतर आता अॅड. वाजिद खान यांनीही या प्रकरणावर आक्षेप घेत हार्दिक पंड्याविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला आहे.

# शुभमन गिल 'क्रिकेटर ऑफ द इयर'; दिला जाणार खास पुरस्कार

महाईन्यूज । पुणे

**भारतीय क्रिकेट संघाचा कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार शुभमन गिल याच्यासाठी हे वर्ष अत्यंत खास ठरणार आहे. २०२५-२६ या वर्षात मैदान गाजवल्याबद्दल बीसीसीआयने त्याला 'सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू' (CRICKETER OF THE YEAR) म्हणून निवडले आहे. तसेच, भारतीय क्रिकेटमधील 'द वॉल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राहुल द्रविडला क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदानासाठी मानाचा जीवनगौरव पुरस्कार दिला जाणार आहे.**







बीसीसीआयचा हा वार्षिक पुरस्कार सोहळा भारतीय क्रिकेटमधील सर्वात प्रतिष्ठेचा आणि मानाचा कार्यक्रम मानला जातो. भारतीय क्रिकेटमधील उल्लेखनीय आणि सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना गौरवण्यासाठी हा सोहळा दरवर्षी मोठ्या दिमाखात आयोजित केला जातो. देशभरातील क्रिकेटप्रेमी, माजी खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रीडा तज्ज्ञ यांचे या सोहळ्याकडे विशेष लक्ष असते. या कार्यक्रमातून भारतीय क्रिकेटमध्ये उत्कृष्ट योगदान देणाऱ्या खेळाडूंना प्रेरणा मिळते तसेच नव्या पिढीतील क्रिकेटपटूंना पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन मिळते.

यंदाच्या सोहळ्यात युवा फलंदाज शुभमन गिल यांना ‘क्रिकेटर ऑफ द इयर’ या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्याची घोषणा करण्यात आली आहे. शुभमन गिलसारख्या युवा आणि प्रतिभावान खेळाडूचा या सोहळ्यात सन्मान होणे हे भारतीय क्रिकेटच्या नव्या युगाची नांदी मानली जात आहे. गेल्या वर्षभरात शुभमन गिलने कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० अशा तिन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये सातत्यपूर्ण आणि दमदार कामगिरी करत धावांचा अक्षरशः पाऊस पाडला आहे. त्याने अनेक महत्त्वाच्या सामन्यांमध्ये संघाला विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. त्याची फलंदाजीतील परिपक्वता, शांत स्वभाव आणि नेतृत्वगुण पाहता तो भविष्यात भारतीय क्रिकेटचा प्रमुख आधारस्तंभ ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बीसीसीआयने त्याच्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आणि मैदानावरील प्रभावी नेतृत्वाचा विचार करून त्याला हा सर्वोच्च बहुमान देण्याचा निर्णय घेतला आहे. मागील वर्षी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याला प्रदान करण्यात आला होता. त्यामुळे यंदा शुभमन गिलला मिळणारा हा सन्मान त्याच्या क्रिकेट कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या भव्य पुरस्कार सोहळ्यात केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या वरिष्ठ खेळाडूंचाच गौरव केला जात नाही, तर देशातील स्थानिक क्रिकेटलाही तितकेच महत्त्व दिले जाते. रणजी ट्रॉफी, विजय हजारे ट्रॉफी आणि सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी यांसारख्या देशांतर्गत स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंनाही या कार्यक्रमात सन्मानित केले जाते. तसेच महिला क्रिकेटमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिला खेळाडूंनाही विशेष पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. त्यामुळे हा सोहळा भारतीय क्रिकेटमधील सर्व स्तरांवरील खेळाडूंना प्रेरणा देणारा आणि त्यांचे मनोबल वाढवणारा ठरतो.

दरम्यान, भारताचे माजी कर्णधार आणि भारतीय संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांना यंदा ‘सी.के. नायडू लाईफटाईम अचिव्हमेंट’ या अत्यंत प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

epaper.mahaenews.com

# महाईन्यूज™

ePaper

। शुक्रवार ।
दि. 13 मार्च 2026 ।


पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# उद्योजकांना बळ द्या; आ. महेश लांडगे

## युद्धजन्य परिस्थितीमुळे उद्योजक संकटात; उपयोजना करण्याची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आंतरराष्ट्रीय पातळीवरील युद्धजन्य परिस्थितीमुळे उद्योजकांना गंभीर आर्थिक संकटाचा सामना करावा लागेल. इराण, इस्त्राईल आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे कच्चा माल, इंधन आणि गॅस पुरवठ्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडसह चाकण औद्योगिक पट्ट्यातील लघु उद्योजक मोठ्या संकटात आहेत. यासाठी राज्य व केंद्र सरकारने ठोस उपायोजना कराव्यात, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली.**



> लघु उद्योजक हे आपल्या राज्य आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया आहेत. आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थितीमुळे सध्या त्यांना मोठे आव्हान आहे. पण, केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नांनी त्यांना संकटातून बळकट करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. कर सवलत, अनुदान, कर्ज सुलभता आणि इंधन-गॅस पुरवठा यांसारख्या उपायांनी उद्योग टिकतील, रोजगार राहतील आणि महाराष्ट्राचा आर्थिक विकास चालू राहील. भाजपा महायुती सरकारच्या माध्यमातून संकटात सापडलेल्या उद्योजकांना दिलासा मिळेल, असा विश्वास आहे.
>
> – महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

महाराष्ट्र विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये 'पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन' च्या माध्यमातून आमदार लांडगे यांनी उद्योजकांच्या समस्यांकडे लक्ष वेधले. लघु उद्योजकांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या जाव्यात. कारण, उद्योजक बंद पडतील, अशी भिती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे उद्योजकांना कर सवलत, अनुदान, आणि आर्थिक मदत यांसारख्या उपायांनी उद्योगांना बळ द्यावे, अशी सूचना आमदार लांडगे यांनी केली.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, युद्धजन्य परिस्थितीमुळे पिंपरी-चिंचवडसह चाकण औद्योगिक क्षेत्रातील अनेक कंपन्या या परिस्थितीत त्यांच्या उत्पन्नावर गंभीर परिणाम सहन करीत आहेत. आंतरराष्ट्रीय परिस्थिती युद्धजन्य असल्यामुळे गॅस आणि कच्चा मालाचा पुरवठा बंद झाला आहे. त्यामुळे उत्पादन ठप्प झाले आहे. व्यावसायिक गॅस सिलेंडरसुद्धा तुटवडा आहे. ॲल्युमिनिअम आणि कॉपरसह इतर धातुंचा पुरवठा बंद झाला आहे. त्यामुळे उद्योजक हवालदिल झाले आहेत.

# पिंपरी चिंचवडला देशातील सर्वात स्वच्छ शहर बनवू; महापौर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**देशातील सर्वात मोठे स्वच्छता सर्वेक्षण मानल्या जाणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण २०२६ ची प्रक्रिया सध्या देशभरात जोमाने सुरू असून पिंपरी चिंचवड महानगरपालिका यंदा देशात अव्वल स्थान मिळवण्यासाठी 'ॲक्शन मोड'मध्ये कामाला लागली आहे. केंद्र सरकारच्या आवासन व शहरी कार्य मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या या सर्वेक्षणासाठी मार्च दरम्यान प्रत्यक्ष क्षेत्रीय पडताळणी सुरू होणार आहे.**



या पार्श्वभूमीवर शहरात स्वच्छता उपक्रमांना अधिक वेग देत कचरामुक्त, स्वच्छ आणि सुंदर पिंपरी-चिंचवड घडविण्यासाठी महापालिका प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यासाठी विविध विभागांची संयुक्त पथके तयार करण्यात आली असून कचरा विलगीकरण, स्वच्छ रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता यावर विशेष भर दिला जात आहे. ही मोहीम पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि सहा. आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. शहरात १०० टक्के कचरा विलगीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ओला , सुका, घरगुती घातक कचरा, सॅनिटरी कचरा वेगळा न करणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्या, दुकाने आणि व्यावसायिक आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्याचे संकेत महापालिकेने दिले आहेत. तसेच कचरा वेळेवर उचलला जावा आणि सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढीग निर्माण होऊ नयेत यासाठी आरोग्य विभाग सतत देखरेख करत आहे. शहरभर विशेष स्वच्छता मोहीम स्वच्छ सर्वेक्षणाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने शहरातील मुख्य रस्ते, चौक, बाजारपेठा आणि अंतर्गत रस्त्यांवर विशेष स्वच्छता मोहीम सुरू केली आहे. कचरा कुंडीमुक्त परिसरासाठी विशेष स्वच्छता पथके तैनात करण्यात आली आहेत. तसेच सार्वजनिक आणि सामुदायिक स्वच्छतागृहांची दुरुस्ती, स्वच्छता आणि पाणी-वीज व्यवस्था सुरळीत ठेवण्यावरही प्रशासन लक्ष केंद्रित करत आहे. स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी शाळांमध्ये स्वच्छता स्पर्धा, रॅली आणि जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये कचरा विलगीकरण आणि स्वच्छता राखण्याबाबत जनजागृती केली जात आहे. यावर्षीच्या सर्वेक्षणात 'स्वच्छ शहर जोडी' हा नवीन उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याअंतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका इतर प्रगत शहरांच्या सर्वोत्तम पद्धतींचा अभ्यास करून त्या शहरात राबविण्याचा प्रयत्न करत आहे. स्वच्छ सर्वेक्षणात नागरिकांचा अभिप्राय शहराच्या क्रमवारीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे नागरिकांनी स्वच्छता ॲप किंवा स्वच्छ भारत मिशनच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन सकारात्मक अभिप्राय नोंदवावा तसेच आपल्या परिसरातील स्वच्छता राखण्यासाठी महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

> पिंपरी चिंचवड शहराला देशातील सर्वात स्वच्छ शहरांमध्ये अग्रस्थानी आणण्याचा आमचा निर्धार आहे. स्वच्छ सर्वेक्षणात अव्वल क्रमांक मिळवण्यासाठी महापालिका प्रशासनाबरोबरच नागरिकांचाही सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रत्येक नागरिकाने कचरा विलगीकरण करणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.
>
> – रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.पुणे.

# १४ वर्षीय शाळकरी विद्यार्थ्याला डंपरने चिरडले!

## चिंचवड येथील प्रेमलोक पार्क परिसरात घडला हा दुर्दैवी अपघात

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**चिंचवड येथील प्रेमलोक पार्क परिसरात घडलेल्या एका दुर्दैवी अपघाताने संपूर्ण परिसराला हादरवून सोडले आहे. भरधाव वेगाने धावणाऱ्या आरएमसी (रेडी मिक्स काँक्रीट) डंपरच्या धडकेत सायकलवरून घरी परतणाऱ्या अवघ्या १४ वर्षीय शाळकरी मुलाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी (दि.१२) दुपारी घडली. या घटनेमुळे परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरणही निर्माण झाले आहे.**



### घटना सीसीटीव्हीमध्ये कैद

हा संपूर्ण अपघात जवळच बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. त्या फुटेजमध्ये आरएमसी ट्रक वेगात येऊन सायकलस्वार मुलाला धडक देतानाचे दृश्य स्पष्टपणे दिसत आहे. या व्हिडिओमुळे अपघाताची तीव्रता आणि भीषणता अधिक स्पष्टपणे समोर आली आहे. पोलिसांनी हे सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून तपासात त्याचा महत्त्वाचा पुरावा म्हणून वापर केला जाणार आहे. या फुटेजच्या आधारे ट्रकचा वेग, चालकाचा निष्काळजीपणा किंवा नियमांचे उल्लंघन झाले का याची सखोल पडताळणी करण्यात येणार आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आकुर्डीहून चिंचवड गावाच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर दुपारी सुमारे साडेबारा वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. फारुक शकील तांबोळी (वय १४) हा नववीत शिक्षण घेणारा विद्यार्थी शाळा सुटल्यानंतर नेहमीप्रमाणे सायकलवरून घरी परतत होता. मात्र, त्याचवेळी भरधाव वेगाने येणाऱ्या आरएमसी ट्रकने त्याला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की फारुकचा जागीच मृत्यू झाला. अचानक घडलेल्या या घटनेमुळे परिसरातील नागरिक स्तब्ध झाले.

घटनेनंतर काही क्षणांतच परिसरात मोठी गर्दी जमली. स्थानिक नागरिकांनी तात्काळ पोलिसांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत मृतदेह ताब्यात घेतला आणि पुढील तपासासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू केली.

दरम्यान, घटनेनंतर पोलिसांनी संबंधित आरएमसी ट्रक ताब्यात घेतला असून ट्रक चालकाला देखील ताब्यात घेण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दत्ता चासकर यांनी सांगितले की, या प्रकरणी गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. अपघात नेमका कशामुळे घडला, ट्रक चालकाचा वेग किती होता, तसेच निष्काळजीपणा झाला का याबाबत सखोल तपास करण्यात येत आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त केला आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, या भागात मोठ्या प्रमाणात आरएमसी ट्रक, डंपर आणि जड वाहने वेगाने धावत असतात. अनेकदा शाळकरी मुले, पादचारी आणि सायकलस्वार या रस्त्यावरून ये-जा करत असतात. त्यामुळे अशा जड वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा अशा दुर्घटना वारंवार घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे या रस्त्यावर वेग मर्यादा लागू करणे, स्पीड ब्रेकर बसविणे आणि जड वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. तसेच शाळांच्या परिसरात वाहतूक व्यवस्थेवर अधिक लक्ष देण्याचीही मागणी करण्यात येत आहे. फारुक शकील तांबोळी हा अत्यंत हुशार आणि शांत स्वभावाचा विद्यार्थी असल्याचे त्याच्या शिक्षकांनी आणि मित्रांनी सांगितले. तो नेहमी अभ्यासात पुढे असायचा आणि भविष्यात मोठे स्वप्न पूर्ण करण्याची त्याची इच्छा होती. मात्र, एका क्षणात झालेल्या या भीषण अपघाताने त्याचे आयुष्य संपले आणि कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

---

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तपदी डॉ. विजय सुर्यवंशी यांची नियुक्ती

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेला अखेर पाच महिन्यांनंतर पूर्णवेळ आयुक्त मिळाले आहेत. कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांची पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडील आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार काढण्यात आला आहे.**



महापालिकेचे तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांची ७ ऑक्टोबर २०२५ रोजी नाशिक कुंभमेळा आयुक्तपदी बदली झाली होती. त्यानंतर महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे महापालिका आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला होता. मागील पाच महिन्यांपासून हर्डीकर यांच्याकडे हा अतिरिक्त पदभार होता.

अतिरिक्त जबाबदारीमुळे केवळ अत्यावश्यक कामांनाच प्राधान्य दिले जात असल्याने महापालिकेचे प्रशासकीय कामकाज काहीसे संथगतीने सुरू असल्याची चर्चा होती. त्यामुळे पदाधिकाऱ्यांकडून पूर्णवेळ आयुक्त देण्याची मागणी होत होती. महापौर रवी लांडगे यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे याबाबत मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांची पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा आदेश शासनाचे सहसचिव सुभाष उमराणीकर यांनी बुधवारी जारी केला.

## चऱ्होलीत गांजा विक्री प्रकरणी एकास अटक



अंमली पदार्थ विरोधी पथकाने चऱ्होली परिसरात छापा टाकून गांजाची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या एका तरुणाला अटक केली. ही कारवाई बुधवारी (११ मार्च) मध्यरात्री आझादनगर येथील एका पान शॉपसमोर करण्यात आली.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल चंद्रकांत जाधव यांनी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी राजेंद्र विष्णू आदुडे (३९, दाभाडे वस्ती, चऱ्होली; मूळ गाव छत्रपती संभाजीनगर) याला अटक केली असून मलकेकर (भाटनगर, पिंपरी) याच्यावरही गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी राजेंद्र हा रस्त्याच्या कडेला सार्वजनिक ठिकाणी गांजा विक्रीसाठी उभा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याच्याकडून २२ हजार ८०० रुपये किमतीचा २४० ग्रॅम गांजा, मोबाईल आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीत हा गांजा त्याने पिंपरीतील मलकेकर नावाच्या व्यक्तीकडून विक्रीसाठी आणल्याचे सांगितले. दिघी पोलीस तपास करत आहेत.

# वर्गातील मशीन लर्निंगपासून उद्योगातील एआयपर्यंतचा प्रवास

## शिक्षण विश्व: एमआयटी आळंदी येथे प्रेरणादायी विशेष व्याख्यान

**महाईन्यूज । आळंदी**

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी (दे.), पुणे येथे उन्नत भारत अभियान समिती व गणित विभागाच्या संयुक्त विद्यमाने “FROM CLASSROOM ML TO INDUSTRY AI: BUILDING SUSTAINABLE, RESPONSIBLE AND COMMUNITY-CENTRIC INTELLIGENCE” या विषयावर विशेष अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.**



या कार्यक्रमासाठी जिओहॉटस्टार येथे डेटा, एआय आणि बॅकएंड अभियंता म्हणून कार्यरत असलेले श्री. मयूर मदनानी हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. हनुमंत मावकर यांनी प्रमुख अतिथींच्या परिचयाने केली. त्यानंतर गणित विभागाच्या विभागप्रमुख सौ. सुषमा चालके यांच्या हस्ते श्री. मदनानी यांचा सत्कार करण्यात आला.

आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात श्री. मयूर मदनानी यांनी वर्गात शिकविल्या जाणाऱ्या मशीन लर्निंग संकल्पनांपासून उद्योगामध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींपर्यंतचा प्रवास अत्यंत सोप्या, समजण्यासारख्या आणि व्यावहारिक उदाहरणांद्वारे स्पष्ट केला. त्यांनी उद्योगक्षेत्रात एआय प्रणाली विकसित करताना येणाऱ्या डेटा व्यवस्थापनातील अडचणी, मॉडेल डिप्लॉयमेंट, मॉनिटरिंग तसेच जबाबदार आणि शाश्वत एआय विकसित करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी उन्नत भारत अभियान समन्वयक डॉ. श्रीराम कारगावकर यांनी विशेष पुढाकार घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे, गणित विभागप्रमुख सौ. सुषमा चालके, गणित विभागातील सर्व प्राध्यापक, उन्नत भारत अभियान समिती तसेच प्रशासकीय कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

### विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

तसेच एआय प्रणालींचे मूल्यमापन करताना केवळ अचूकतेवर भर न देता त्यांची विश्वसनीयता, स्केलेबिलिटी, खर्च-परिणामकारकता आणि समाजावर होणारा परिणाम यांचाही विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना उद्योगातील अपेक्षा, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी याबाबत महत्त्वपूर्ण दृष्टिकोन मिळाला. हा कार्यक्रम बी.एस्सी. (AI & ML) तसेच एस.वाय. एम.एस्सी. (IMCA) या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात एकूण १२४ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



# "The Benefits of Exercise."

## "Move Your Body, Feel Your Best."

**Did you know that a simple 10-minute walk can change your whole mood? Many people think exercise is just about building big muscles, but it is actually the best medicine for your body and your brain**






In the past, humans stayed active by hunting and farming. Today, many of us spend hours sitting at desks or looking at screens. Because our bodies were designed to move, staying still for too long can make us feel stiff and tired. Exercise comes in many forms, like swimming, dancing, or playing sports. It helps your heart pump blood better and keeps your bones strong. For example, jumping rope or running helps your lungs get more oxygen, which gives you more energy to get through the day. When we compare an active lifestyle to a "sedentary" (sitting) one, the results are clear. People who exercise regularly usually sleep better and feel less stressed. You don't need to go to a gym to see these results; even small movements like taking the stairs instead of the elevator make a big difference over time.

In short, exercise is not a chore—it is a gift for your health. You don't have to run a marathon to stay fit. Just find an activity you enjoy and try to do it for a few minutes every day. Why not start with a quick stretch right now?

**Akshara Gawari**
**Grade IX**
**Priyadarshani School, Moshi**

